महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१

दूरध्वनी क्र.०२२- २२६२०२३१/३२, Email : higherartexam@gmail.com

क्रमांक : डिओए/एचएई-२०२०/चार/४१४ दिनांक: ०९/१०/२०२०

## परिपत्रक

**शासकीय उच्चकला परीक्षा २०२०**

**सैध्दांतिक विषयाच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबतच्या सूचना**

अंतिम वर्ष पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील सैध्दांतिक विषयाच्या परीक्षेबाबतच्या सुचना, उपस्थिती तक्ता व तद्नुषंगीक माहिती दिनांक ०८/१०/२०२० रोजी कला महाविद्यालयांतील अधिष्ठाता / प्राचार्यांच्या ईमेल ॲड्रेसवर पाठविण्यात आली असून प्रत सोबत जोडली आहे.

२. दिनांक १२/१०/२०२० रोजी पासून सैध्दांतिक विषयांच्या उच्चकला परीक्षा सुरु होत असून वेळापत्रकानुसार अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या ईमेल ॲड्रेसवर विषयनिहाय प्रश्नपत्रिका PDF File स्वरुपात, विषयनिहाय Password सहीत ३ तास अगोदर पाठविण्यात येणार आहे. अधिष्ठाता/प्राचार्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त होणा-या विषयनिहाय प्रश्नपत्रिका Download करुन संबधीत विद्यार्थ्यांना परीक्षा सुरु होण्याच्या ५ मिनिट अगोदर व्हॉट्सअ‍ॅप/ईमेल द्वारे प्राप्त झालेल्या Password सहीत पाठविण्यात यावी. विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका प्राप्त झाल्यानंतर अधिठाता/प्राचार्यांकडून प्राप्त झालेला Password टाकून प्रश्नपत्रिका ओपन करावी. या सुचना अधिष्ठाता / प्राचार्यांनी संबधीत विद्यार्थ्यांना द्याव्यात. अपवादात्मक परिस्थितीत अधिष्ठाता/प्राचार्यांनी प्रश्नपत्रिकेचा Screen Shot /Print Out घेऊन संबधीत विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका ऑनलाईन पध्दतीने पाठवितांना गोपनियतेचा भंग होणार नाही याची काळजी अधिष्ठाता / प्राचार्यांनी घ्यावी.

३. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी आवश्यकतेनुसार श्री. संदिप डोंगरे (९४२२३३२४१९) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर तथा सहायक निरीक्षक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्रीमती आरती श्रावस्ती (९८२०४०२६२२), सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई व श्री. अनिल सोनावणे (९४२१५१४५४२), सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधून वेळापत्रक व मार्गदर्शक सुचनानुसार परीक्षा सुरळीतपणे पार पाडावी.

(ना. म. वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४) प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला महाविद्यालये.

प्रत,

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई.
३) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर.
४) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
५) निवड नस्ती.

Scanned by TapScanner